## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

परिपत्रक क्र.कोविमं /माध्य. परीक्षा/ नोव्हेंबर-डिसेंबर २०२० /श्रेणी तक्ते/ 5605/ दिनांक १७ नोव्हेंबर,२०२०

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते(Grade List) OMR पध्दतीप्रमाणे वितरण केंद्रावर वितरीत करण्यात आलेली आहेत. तरी सदरची पुनर्परीक्षार्थी (**Repeater**) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते बिनचूक भरुन **ते दिनांक ०७ डिसेंबर २०२० रोजी वितरण केंद्रावरील प्रतिनिधीकडे** निर्धारित वेळेत **हस्तपोहोच जमा** करण्यात यावेत. **उशीरा प्राप्त होणाऱ्या श्रेणी तक्त्याबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** सदरचे श्रेणीतक्ते इतर कोणत्याही पाकिटात न भरता कार्यालयाने पुरविलेल्या श्रेणी तक्त्याच्या पाकिटातच (Grade List पाकिटात) भरुन सदरचे श्रेणी तक्त्याचे पाकिट पाठवावे. तसेच श्रेणीतक्त्याच्या **पाकिटावर ठळक अंकात शाळेचा सांकेतिक क्रमांक लिहावा.** श्रेणीतक्ते वेळेत जमा न केल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाचे कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**श्रेणीतक्ते भरताना घ्यावयाची काळजी –**

१) पुनर्परीक्षार्थी (REPETER) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते **OMR** पध्दतीने भरावयाची असल्यामुळे विद्यार्थ्यांना या पध्दतीनुसार श्रेणीतक्ते देण्यात आलेली आहेत. (अ) सदरहू श्रेणीतक्त्यामध्ये हे P1 (Physical Education) & R7 (self development and art appre.) हे शालेय विषय सक्तीचे असल्यामुळे त्यांचे विषय कोड श्रेणी तक्त्यात नमूद केलेले आहेत. या विषयाच्या खालील चौकटीमध्ये आतील चौकटीला स्पर्श न करता खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. (ब) कार्यानुभव/शालेय वैकल्पिक विषयाची श्रेणी भरताना विषय क्रमांकासाठी २ चौकटी दिलेल्या आहेत. त्या २ चौकटीच्या आतील चौकटीला स्पर्श न करता विषय कोड दर्शविण्यात यावा व त्याच्यापुढील श्रेणी चौकटीच्या आतील चौकटीमध्ये खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. उदा.

| Index No | Grade Code |
|---|---|
| P 4 | 3 |

२) **पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणेच भरण्यात यावी. फक्त गैरहजर विद्यार्थ्यासाठी AA अशी श्रेणी नोंदविण्यात यावी. श्रेणी तक्ते भरताना कोणत्याही परिस्थितीत व्हाईटनरचा वापर करणेत येवू नये .**

३) श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे **सांकेतांक (Index No.)** नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादित केलेली श्रेणी **(Grade)** अंकामध्ये **(Numeric Code मध्ये) अचूक नोंदवाव्यात.** श्रेणीतक्त्यात श्रेणी नोंदविताना श्रेणी तक्त्याच्या खाली मुद्रित करण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन खालील प्रमाणे श्रेणीची नोंद करावी.

- A ग्रेडसाठी — 3 — (60% &above marks)
- B ग्रेडसाठी — 2 — (45% & 59% marks)
- C ग्रेडसाठी — 1 — (35% & 44% marks)
- D ग्रेडसाठी — 0 — (35% & below marks)
- E ग्रेडसाठी — 4 — (Exempted subject )
- **गैरहजरसाठी विद्यार्थ्यासाठी — A**
- **अपंगासाठी (Handicapped) — 5 (फक्त शारिरीक शिक्षण व इतर विषयास श्रेणी द्यावी)**
- **मार्च २००८ पूर्वीचे परीक्षार्थी नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्यांना पूर्वी पर्यावरण (38) व व्यक्तिमत्व विकास (R6) विषय नसल्यामुळे या विषयासाठी NN श्रेणी दर्शवावी. व तसेच स्व-विकास व कला रसास्वाद (R7) हा श्रेणी विषय ज्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा नाही अशा विद्यार्थ्यांची श्रेणी (R7) च्या रकान्यात NN अशी दर्शविण्यात यावी याचीही नोंद घ्यावी.**

**४) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे शालेय वैकल्पिक विषयास पास श्रेणी मिळून त्यांचा तो विषय सुटलेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे श्रेणीतक्ते भरताना त्या विषयापुढे विषय सूटसाठी 4 (Exempted) अशी श्रेणी दर्शवावी.**

**५) ज्या विद्यार्थ्यांना मार्च-१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेस व्यक्तिमत्व विकास (R6), समाजसेवा (P6), कार्यशिक्षण (P7), व्यवसाय मागदर्शन (R4), यापैकी एका विषयामध्ये सूट मिळालेली नाही अथवा विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमातील नव्याने समाविष्ट झालेला शालेय श्रेणी विषयातील स्व-विकास व कला रसास्वाद (R7), हा श्रेणी विषय घेऊन पुढील परीक्षेस प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण व्हावे लागेल.**

**६) गैरहजर विद्यार्थ्यासाठी A व ३५% पेक्षा कमी श्रेणी दर्शविताना 0 श्रेणी लाल शाईने लिहाव्यात.** मात्र या श्रेणी लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यास ३५% पेक्षा कमी गुण व विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री करूनच श्रेणी लिहाव्यात. मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की निकालानंतर **0** व **A** श्रेणी दिलेला विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही केवळ या श्रेणी दिल्यामुळे त्यांचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होतो. निकालानंतर शाळाप्रमुख श्रेणी दुरूस्ती व निकाल दूरूस्तीचा प्रस्ताव सादर करतात. निकालानंतर कोणत्याही श्रेणीमध्ये व निकालात बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्यास चूकीची श्रेणी दिल्यामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

**विभागीय सचिव**
**कोल्हापूरविभागीय मंडळ,कोल्हापूर**

**मार्च-२० परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची ग्रेड लिस्ट देण्यात आलेली नाही याची नोंद घ्यावी.**